# संपादकीय...

## पाकच्या उचापती

भारत पाकिस्तान यांच्यातील वैर पिढीजात आहे. त्यामुळे पाकिस्तान सतत भारताच्या विरोधात कुरापती करीत असतो. कुठलीही गोष्ट भारत करू लागला, मग त्यात अपशकून घडवणे, हेच पाकिस्तानचे ठरलेले धोरण आहे. त्यातून त्याचे कुठलेही कल्याण झालेले नाही; पण दुसरे काहीही करायला नसल्याने पाकिस्तान सतत तशाच उचापती करीत असतो. म्हणूनच आता अणू ऊर्जा पुरवठेदार गटात भारताला प्रवेश मिळणार म्हटल्यावर पाकिस्तानला पोटदुखी जडली असेल, तर नवल नाही. मग भारताचा दुसरा तसाच शेजारी चीनने त्यात अडथळे आणले तरी समजू शकते; पण त्या निमित्ताने जे काही दावे व युक्तिवाद केले जात आहेत, त्यातून आपण हास्यास्पद ठरू नये याची तरी काळजी, त्या देशाच्या मुत्सद्दी व नेत्यांनी घ्यायला नको काय? चीनने त्या गटामध्ये भारतासोबतच पाकिस्तानचा समावेश व्हावा, असा हट्ट धरला आहे. त्यालाही भारताला अपशकून करण्यातच रस आहे; पण तितक्याने पाकिस्तानला किती झिंग चढावी? पाकचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार सरताज अझिज यांनी तर त्याही युक्तिवादाच्या पुढे जाऊन मुक्ताफळे उधळली आहेत. अशा राष्ट्रांच्या गटात भारतापेक्षा पाकिस्तानच अधिक पात्र सदस्य आहे, असा त्यांचा दावा आहे. त्या पात्रतेसाठी त्यांनी खूप जुना संदर्भ दिला आहे. १९७४ सालात अशा गटाची स्थापना झाली आणि नव्याने अणूसंशोधन करणाऱ्या देशांना त्याचा शस्त्रास्त्रांसाठी वापर करणार नसल्याचे मान्य करण्याचे बंधन घालण्यात आले. अण्वस्त्र प्रसारबंदीचा जागतिक करार सर्वांना लागू करण्यात आला. तोपर्यंत म्हणजे १९७४ सालापर्यंत ज्याची अण्वस्त्रसज्ज्ञता असेल, ते देश वगळून बाकीच्या संशोधक देशांना ती सक्ती करण्यात आली. योगायोगाने भारताने त्याच वर्षी अणुस्फोट करून आपणही अणूसज्ज्ञ देश होऊ शकतो, असे सिद्ध केले होते. त्यानंतर असा करार व पुरवठेदारांचा गट तयार झाला होता. म्हणूनच त्यातला आरोपी गुन्हेगार भारत असल्याचा शोध सरताज नावाच्या पाकिस्तानी मुत्सद्दी नेत्याने लावला आहे. भारताच्या त्या अणुस्फोटामुळे अण्वस्त्र तंत्रज्ञानाचा गैरवापर झाला आणि निर्बंध लावण्याची गरज निर्माण झाली. म्हणून भारत अणूसंशोधनातील गुन्हेगार आहे, साहजिकच तो अपात्र आहे, असा या सरताज अझिज यांचा निष्कर्ष आहे. मात्र पाकिस्तानवर असा कुठलाही आक्षेप घेता येत नाही, म्हणूनच भारतापेक्षा पाकिस्तान जागतिक अणू पुरवठेदार गटाचा सदस्य व्हायला अधिक लायक असल्याचा हा युक्तिवाद, नुसताच निरर्थक नाही, तर हास्यास्पद आहे. कारण विषय अणूसज्ज्ञ होण्याचा नसून, घातक व्यक्ती व सत्ताधाऱ्यांच्या हाती अणुतंत्रज्ञान जाण्यावर निर्बंध आहे. तिथे पाकिस्तानची लायकी किती व कोणती आहे? त्यात पाकिस्तानने माफियांनाही लाजवील असा पराक्रम केला आहे.

भारताच्या अण्वस्त्राचे जनक म्हणून डॉ. अब्दुल कलाम यांच्याकडे बघितले जाते आणि म्हणूनच त्यांना राष्ट्रपतिपदाचा मान सर्वानुमते देण्यात आला होता. उलट पाकच्या अणुबॉम्बचे जनक मानल्या जाणाऱ्या डॉ. ए. क्यू. खान यांच्याकडे बघता येईल. ते स्वित्झर्लंडमध्ये विद्यार्थीदशेत असताना दाखल झाले. आपल्या गुणवत्तेने त्यांना अणूसंशोधनात सहभागी करून घेण्यात आलेले होते. त्या देशाने जो विश्वास खान या पाकिस्तान्यावर टाकला, त्याच्याशी ते किती प्रामाणिक राहिले? अतिशय धूर्तपणे त्यांनी एक एक तंत्र व नकाशे चोरून पाकिस्तानात आणले आणि नंतर पाकिस्तानी अणूसंशोधनाचा पाया घातला. शांततेसाठी अणूसंशोधन वापरण्याच्या अटी पाळून मिळालेल्या साधने व साहित्याचा वापर, मग चोरट्या मार्गाने अणुबॉम्ब विकसित करण्यासाठी झाला.तिथेच ते थांबले नाहीत. त्यांनी ते तंत्र व चोरटे साहित्य गुपचुप लिबीया व उत्तर कोरिया आदी देशांना राजरोस विकले होते. हे दोन्ही देश व त्यांचे सत्ताधीश माथेफिरू म्हणून जगभर प्रसिद्ध आहेत. त्यांच्या हाती अणूसज्ज्ञता पडणे, म्हणजे जगाला अणुयुद्धाच्या खाईत लोटल्यासारखे होते. म्हणूनच जेव्हा या चोरट्या विक्री व्यापाराचा गाजावाजा झाला, तेव्हा डॉ. खान यांच्या विरोधात जगभर वादळ उठले होते. त्याचे पाकिस्तानवर इतके दडपण आले, की मायदेशीच या अणूसंशोधनाच्या जनकाला तुरुंगात टाकावे लागले होते. अन्यथा त्याला परदेशी पोलिस व सरकारांच्या हवाली करावे लागले असते. त्यातून पळवाट म्हणून पाकिस्तानने त्याच्यावर मायदेशी खटला भरून गुन्हेगार ठरवले होते. काही वर्षे खान तुरुंगात पडले होते. अणूसंशोधनावर जागतिक निर्बंध ज्या कारणासाठी घातले जातात व तंत्रसाहित्यावर प्रतिबंध आहेत, त्याचे उल्लंघन करण्यात पाकिस्तान खरा गुन्हेगार आहे. म्हणूनच चीन वगळता कुठलाही देश पाकिस्तानच्या बाजूने उभा रहायला तयार नाही. भारताचे पारडे जड होते म्हणताच, पाकने धावपळ करून विविध देशांना गाठण्याचा प्रयत्न केला; पण प्रत्येक जागी त्यांना नकारच मिळाला. रशियाने तर पाकचे कानच उपटले. अशा कीर्तीवंत' देशाचा हा सरताज पाकिस्तानची पात्रता सांगू पहातो, तेव्हा म्हणूनच या विषयातले जाणकार फिदीफिदी हसत असतात. भारताला पाण्यात बघायचे सोडून पाकिस्तान आपल्या विकासाची स्वप्ने बघू लागेल, तेव्हा अधिक प्रगत व बलवान होऊ शकेल. आपली गुणवत्ता वाढवून प्रबळ होण्याऐवजी द्वेषाने धुसफुसत रहाण्याने भारताचे थोडेफार नुकसान होऊ शकेल. त्यापेक्षा अधिक काही होणार नाही. उलट पाकिस्तानचे हसे मात्र नक्की होणार आहे.

# दाभोलकर हत्येप्रकरणी वीरेंद्र तावडे अटकेत

### ■ सीबीआयची कारवाई; आज न्यायालयात हजर करणार

**मुंबई –**

डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या हत्येप्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) आज रात्री हिंदू जनजागृती समितीच्या वीरेंद्र तावडे याला अटक केली. दाभोलकर यांच्या हत्येनंतर सुमारे अडीच वर्षांनी करण्यात आलेली ही पहिलीच अटक आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, वीरेंद्र तावडे याला रात्री साडेआठच्या सुमारास अटक करण्यात आली. त्याला उद्या पुण्यातील न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याचे समजते. सीबीआयच्या अधिकाऱ्यांनी एक जून रोजी सकाळी पुण्यातील शनिवार पेठेतील सनातनचे साधक सारंग दिलीप अकोलकर आणि पनवेलमध्ये वीरेंद्र तावडे या दोघांच्या घरांची झडती घेतली. त्यात काही महत्त्वाची कागदपत्रे, मोबाईल क्रमांक आणि ई–मेलची तपासणी केली होती. तावडे हा दाभोलकर हत्या प्रकरणात संशयित होता. सीबीआयसह राज्य दहशतवादी विरोधी पथकाचे (एटीएस) अधिकारी त्याच्या



मागावर होते.सारंग अकोलकर आणि तावडे यांच्यात ई–मेलवरून संपर्क होता. पनवेलमध्ये सनातनच्या आश्रमाजवळच तावडेचे घर आहे. गेल्या आठवड्यातील छाप्यानंतर तावडेला सीबीआयने चौकशीसाठी बोलावले होते. तो आज चौकशीसाठी हजर झाला होता. त्यानंतर रात्री त्याला अटक करण्यात आल्याचे समजते. वीरेंद्र तावडे सात– आठ वर्षे साताऱ्यात होता. गणपतीदान मोहिमेला त्याने विरोध केला होता. मडगाव बॉंबस्फोट प्रकरणातील संशयितांशी त्याचा संपर्क असल्याचा सीबीआयचा संशय आहे. दाभोलकर यांची पुण्यात ओंकारेश्वर मंदिराजवळ पुलावर दोन मारेकऱ्यांनी गोळ्या झाडून हत्या केली होती. सकाळी सव्वासातच्या सुमारास हा करून मारेकरी दुचाकीवरून पसार झाले होते. याप्रकरणी डेक्कन पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास गुन्हे शाखेसह इतर यंत्रणांनी केला. परंतु, त्यांना अपयश आल्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाने हा तपास सीबीआयकडे सोपविला होता. सीबीआयनेही संशयितांची रेखाचित्रे जारी केली. परंतु, मारेकऱ्यांना पकडण्यात यश आले नव्हते.

वीरेंद्र तावडेला अटक करून सीबीआयने मोठे पाऊल उचलले आहे. तावडे मुख्य सूत्रधार आहे की अन्य कोणी, हे निश्चित नाही; परंतु या कटात त्याची मुख्य भूमिका असावी याबाबचे पुरावे मिळाले असावेत म्हणून त्याला अटक झाली

## सागरी सुरक्षेसाठी स्वतंत्र केंद्रीय सागरी सुरक्षा दलाची स्थापना करावी

**मुंबई : प्रतिनिधी**

सागरी सुरक्षेसाठी केंद्र शासनाने अनेक महत्त्वपूर्ण उपाययोजना केल्या आहेत. ही सुरक्षा आणखी बळकट करण्यासाठी केंद्रीय पोलीस दलाच्या धर्तीवरच स्वतंत्र सागरी सुरक्षा दलाची स्थापना करावी, अशी आग्रही मागणी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. ही मागणी महत्त्वपूर्ण असून त्यावर सकारात्मक विचार करण्यात येईल, असे केंद्रीय गृहमंत्री राजनाथ सिंह यांनी यावेळी सांगितले.

देशाच्या सागरी किनाऱ्यावरील राज्यांची किनारी सुरक्षा व मच्छिमारांना बायोमेट्रिक ओळखपत्र देण्यासंदर्भातील कार्यपद्धतीची आढावा बैठक आज येथील सह्याद्री अतिथीगृहात केंद्रीय गृहमंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय गृह राज्यमंत्री किरण रिजिजू, अंदमान निकोबारचे नायब राज्यपाल ले. जनरल (निवृत्त) ए. के. सिंग, पाँडेचरीचे महसूल मंत्री एम.ओ. एच.एफ. शाहजहान, कर्नाटकचे गृहमंत्री डॉ. जी. परमेश्वर, गुजरातचे गृहराज्यमंत्री रजनीभाई पटेल, केंद्रीय गृह सचिव राजीव मेहर्षी, केंद्रीय सचिव श्रीमती नैनी जयासीलन, सीमा व्यवस्थापनचे सचिव सुशीलकुमार, महाराष्ट्राचे मुख्य सचिव स्वाधीन क्षत्रिय, पोलीस महासंचालक प्रवीण दीक्षित, भारतीय तटरक्षक दलाचे महासंचालक राजेंद्र सिंग, यांच्यासह देशाच्या सागरी किनाऱ्यावरील राज्यांचे मुख्य सचिव, पोलीस महासंचालक उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मासेमारी बोटींचे कलर कोडिंग, मासेमारांना बायोमेट्रिक कार्डस् आणि कम्युनिटी पोलिसिंगमध्ये स्थानिकांचा सहभाग याबाबत महाराष्ट्र सरकारने केलेल्या प्रगतीचा आढावा सादर केला. मुख्यमंत्री श्री. फडणवीस पुढे म्हणाले की, गेल्या दोन वर्षात केंद्र शासनाने सागरी किनाऱ्यावरील सुरक्षा मजबूत होण्यासाठी सक्रियता व सजगता दाखविली आहे. केंद्राने राज्यांबरोबर संवाद साधून किनाऱ्याच्या सुरक्षेसाठी ठोस उपाययोजना आखल्या आहेत. सागरी किनाऱ्यांची सुरक्षा ही महाराष्ट्रासाठी अतिशय महत्त्वाची असून त्यासाठी राज्य शासन महत्त्वाची पावले उचलत आहे.



शाळांतील विद्यार्थ्यांशी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट संवाद साधला.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विद्यार्थ्यांशी दिलखुलास गप्पा

**पुणे : प्रतिनिधी**

शाळा स्वच्छ आहे का, शाळा आवडते का, शाळेतले काय आवडते, शाळेमध्ये पिण्याचे स्वच्छ पाणी आहे का, कोणता विषयक आवडतो, शाळांतील सुविधांबाबत अथवा सुधारणांबाबत आपणास मला काही सांगायचे आहे काय ? असे प्रश्न विचारुन राज्यातील विविध उपक्रमशील शाळांतील विद्यार्थ्यांशी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी थेट संवाद साधला.

उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर राज्यातील शाळा आज सुरु झाल्या. शालेय शिक्षण विभागाच्यावतीने यानिमित्ताने व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा शालेय विद्यार्थी, शिक्षक व पालक यांच्याशी संवाद घडवून आणला.

डिजीटल शाळा विषयावर जिल्हा परिषद शाळा, पाष्टेपाडा, शहापूर, जि.ठाणे, रचनावादी शाळा या विषयावर पेठ, जि.लातूर, लोकसहभागासाठी केंजळ, जि.पुणे, ऊसतोड कामगारांच्या मुलांचे स्थलांतरण थांबवल्याबद्दल वरवंडी तांडा, जि.औरंगाबाद, समाज सहभागातून संगणक प्रयोग शाळा उभारणीसाठी निकुंभे, जि.धुळे आणि डिजीटल क्लासरुम निर्मितीसाठी भागसरी, जि.नंदूरबार येथील शाळांतील विद्यार्थ्यांशी आज मुख्यमंत्र्यांनी थेट संपर्क साधला. यावेळी विद्यार्थ्यांशी झालेल्या संवादातून मुख्यमंत्र्यांनी शाळेतील उपलब्ध सुविधा व विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा आढावा घेतला. राज्याच्या मुख्यमंत्र्यांशी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे संपर्क साधताना शाळांतील विद्यार्थी प्रचंड उत्साही होते. तसेच त्यांच्या चेहऱ्यावर कुतुहलसुद्धा होते. मुख्यमंत्र्यांनी विचारलेल्या प्रश्नांना यावेळी विद्यार्थ्यांनी समर्पक उत्तरे दिली. पालकांशी संवाद साधताना मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या पाल्यांच्या समस्या जाणून घेतल्या. शिक्षकांनी एक पिढी तयार करीत आहोत, या भावनेने विद्यार्थ्यांना शिक्षण द्यावे, अशी सूचनाही यावेळी मुख्यमंत्र्यांनी केली.

शिक्षकांनी तयार केलेले नाविण्यपूर्ण उपक्रम राज्यातील सर्व शाळांमध्ये पोहोचविण्यात येतील. यामुळे विद्यार्थ्यांची ज्ञानवृद्धी होण्यास मदत होईल, असे मुख्यमंत्र्यांनी शिक्षकांना सांगितले. या उपक्रमातून राज्यातील शिक्षकांनी प्रेरणा घ्यावी, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी शिक्षकांना केले. प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमाचा आढावा यावेळी मुख्यमंत्र्यांनी घेतला. प्रगत शैक्षणिक कार्यक्रमावर आधारित जीवन शिक्षण मासिकाचे विमोचन यावेळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी पालकमंत्री गिरीश बापट, जिल्हा परिषद अध्यक्ष प्रदीप कंद, खासदार अनिल शिरोळे, आमदार माधुरी मिसाळ, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचे प्रधान सचिव नंदकुमार, विभागीय आयुक्त एस.चोक्कलिंगम, शिक्षण आयुक्त पुरुषोत्तम भापकर, जिल्हाधिकारी सौरभ राव, महानगरपालिकेचे आयुक्त कुणाल कुमार, मुख्य कार्यकारी अधिकारी दौलत देसाई, एनसीईआरटी संचालक गोविंद नांदेडे, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे संचालक एन.के. जरग, शिक्षण सहसंचालक एन.एन. नांगरे आदी उपस्थित होते.